"तेलंगणा सीमाभागातील निवडक लेखकांच्या साहित्यकृतींचा चिकित्सक अभ्यास (विशेष संदर्भ : नांदेड जिल्हा)”

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

मानव विद्याशाखेअंतर्गत मराठी विषयातील पीएच.डी. (विद्यावाचस्पती)
या पदवीकरिता सादर करावयाचा
शोधप्रबंधाचा आराखडा

संशोधक

रमेश गोविंदराव शेंडगे

एम.ए., बी.एड., नेट/सेट

मार्गदर्शक

प्रा.डॉ.मारोती दशरथ कसाब

एम.ए., एम.फिल., पीएच.डी.
सहयोगी प्राध्यापक, मराठी विभाग
महात्मा फुले महाविद्यालय, अहमदपूर
ता.अहमदपूर जि.लातूर

संशोधन केंद्र
श्री हावगीस्वामी महाविद्यालय, उदगीर जि.लातूर

ऑगस्ट - २०२३

"तेलंगणा सीमाभागातील निवडक लेखकांच्या साहित्यकृतींचा चिकित्सक अभ्यास (विशेष संदर्भ : नांदेड जिल्हा)”

प्रस्तावना :

महाराष्ट्राच्या मराठवाडा विभागातील नांदेड जिल्ह्याला तेलंगणा राज्याची सीमा लागून आहे. सीमाभागात मराठी भाषिकांची संख्या मोठ्या प्रमाणात आहे. नांदेड जिल्ह्यातील देगलूर आणि बिलोली हे तालुके तेलंगणा राज्याच्या सीमारेषा आहेत. त्यामुळे देगलूर आणि बिलोली या परिसरातील लोकांचा तेलंगणाशी लोकव्यवहार होत असतो. येथील भाषा, संस्कृती, रुढी-परंपरा यात साम्यता दिसून येते. अनेक साहित्यिकांनी आपल्या साहित्याच्या माध्यमातून तेलंगणा सीमाभागातील जाणिवा प्रकट केलेल्या दिसून येतात. आजही जुक्कल, बिचकुंदा परिसरात अनेक लोक मराठी भाषा बोलतात. तसेच देगलूर परिसरातील मराठी भाषेवर तेलंगणाचा चांगलाच प्रभाव असलेला दिसून येतो. हा प्रभाव साहित्यातूनही पहावयास मिळतो.

बाबू बिरादार, पद्मा मदकुंटे, तसनीम पटेल, लक्ष्मण मलगीरवार तसेच अनेक नवोदित साहित्यिक आपल्या लेखणीच्या माध्यमातून सीमावर्ती तेलंगणातील संस्कृती व समस्यांवर प्रकाश टाकत आहेत. बाबू बिरादार यांची 'कावड', पद्मा मदकुंटे यांच्या 'झापड', 'भयलाट', 'जायदाद' या कादंबऱ्या तर तसनीम पटेल यांचे 'भाळ-आभाळ' हे आत्मचरित्र, लक्ष्मण मलगीरवार यांचे 'ओले रान', 'उजळावया आलो वाटा', 'आभाळ पाहताना' हे काव्यसंग्रह असे दर्जेदार साहित्य आणि साहित्यकार आपणास पहावयास मिळतात.

नांदेड जिल्ह्याच्या तेलंगणा सीमाभागातील मराठी साहित्य या विषयावर संशोधन करताना देगलूर व बिलोली तालुका अशी मर्यादा घालून घेतलेली आहे. या परिसरातील भाषेवर तेलंगणाचा असलेला प्रभाव साहित्यातून जाणवतो. या परिसरातील

लोकांच्या बोलण्यात आलुस, गेलुस अशी क्रियापदे वापरली जातात. या सीमावर्ती भागातील सृजनात्मक साहित्य, त्यांच्या साहित्याचे वेगळेपण, जाणिवा, भाषिक सौंदर्य, ग्रामजीवनातील नातेसंबंध व विश्वास इत्यादीचा शोध घेण्याच्या उद्देशाने प्रस्तुत विषयाची निवड केली आहे.

अभ्यासविषय निवडीमागील उद्दिष्ट्ये :

'तेलंगणा सीमाभागातील निवडक लेखकांच्या साहित्यकृतींचा चिकित्सक अभ्यास' या संशोधन विषयाच्या अनुषंगाने पुढील उद्दिष्ट्ये निश्चित करण्यात आली आहेत.

१. तेलंगणा सीमाभागातील मराठी साहित्यसंस्कृतीचा शोध घेणे.

२. तेलंगणा सीमाभागातील मराठी साहित्याच्या प्रेरणा समजून घेणे.

३. तेलंगणा सीमाभागातील मराठी साहित्याचे स्वरूप लक्षात घेणे.

४. तेलंगणा सीमाभागातील मराठी साहित्याची बलस्थाने व मर्यादा यावर प्रकाश टाकणे.

५. तेलंगणा सीमाभागातील मराठी साहित्यातील मूल्ये व सौंदर्यस्थळाचा शोध घेणे.

६. तेलंगणा सीमाभागातील मराठी साहित्यातील भाषेचा शोध घेणे.

७. तेलंगणा सीमाभागातील मराठी साहित्यातील निवेदनशैली, भाषिक सौंदर्य, नवीन शब्द, म्हणी व वाक्प्रचार यांचा शोध घेणे.

विषयाचे महत्त्व :

कोणत्याही विषयाचे जेव्हा संशोधनात्मक स्वरूप लक्षात घेतले जाते तेव्हा त्याच्या उपयोजनात्मक स्वरूपाकडे पाहिले जाते. तेलंगणातील मराठी माणसांची संस्कृती, त्यांना आलेले अनुभव, कृषीजीवन लेखकांनी आपल्या साहित्यातून मांडण्याचा प्रयत्न केला आहे. महाराष्ट्रातील वाङ्मयाच्या अभ्यासकांनी याची फारशी दखल घेतली नाही. या सीमाभागातील साहित्याची नोंद घेतल्यास मराठी साहित्य आणखी समृद्ध

होईल. तसेच या परिसरात विविध प्रकारच्या वैशिष्ट्यपूर्ण भाषा आहेत. त्यांचा संदर्भ या साहित्यातून शोधणे आणि त्यांचे भाषिक विश्लेषण करणे महत्त्वाचे आहे.

विषयाची व्याप्ती व मर्यादा :

कोणत्याही संशोधनाची व्याप्ती आणि त्याची मर्यादा निश्चित करावी लागेल. ते खालीलप्रमाणे

१. व्याप्ती :

देगलूर तालुक्यातील काही साहित्यिकांनी अगोदरपासून लेखन केले आहे. यातील काही निवडक लेखकांच्या साहित्यकृतींचा अभ्यास संशोधनासाठी निवडला आहे. या साहित्याच्या माध्यमातून विविध अभ्यास पद्धतींद्वारे अभ्यास करण्यात येणार आहे. या साहित्यातील सामाजिक, सांस्कृतिक, भाषिक आणि वाङ्मयीन सौंदर्याचा धांडोळा घेतला जाणार आहे. तसेच नवीन साहित्यिक संभाजी मंडगीकर व इतरांचा अभ्यास यात केला जाणार आहे, ही या संशोधनाची व्याप्ती आहे.

२. मर्यादा :

'नांदेड जिल्हयाच्या तेलंगणा सीमाभागातील निवडक लेखकांच्या साहित्यकृतींचा अभ्यास' असा संशोधकाचा संशोधन अभ्यास विषय आहे. यामध्ये केवळ तेलंगणा सीमाभाग यातील लेखकच अभ्यासावयाचे आहेत. प्रस्तुत संशोधनामध्ये समीक्षा व अनुवादित साहित्याचा समावेश नाही. तर केवळ सर्जनात्मक साहित्याचा विचार केला जाणार आहे, ही या अभ्यास विषयाची मर्यादा आहे.

गृहितके :

कोणत्याही संशोधनकार्याला निश्चित दिशा व संभाव्य परिक्षेत्र ठरवून घेण्यासाठी गृहितकांची मांडणी करणे आवश्यक असते. प्रस्तुत विषयावर संशोधन करताना खालील गृहितके मांडण्यात आलेली आहेत.

१. तेलंगणा सीमाभागातील मराठी साहित्याची परंपरा समृद्ध आहे.

२. तेलंगणा सीमाभागातील मराठी साहित्य समीक्षकांच्या दृष्टीने दुर्लक्षित आहे.

३. तेलंगणा सीमाभागातील मराठी साहित्यिकांनी मराठी साहित्य व संस्कृतीची जोपासना केली आहे.

४. तेलंगणा सीमाभागातील मराठी साहित्यातील भाषाशैली, निवेदन याबाबतीत वेगळेपण दिसून येते.

५. आधुनिक मराठी वाङ्मयाच्या इतिहासात तेलंगणा सीमाभागातील मराठी साहित्य खूप महत्त्वाचे आहे.

संशोधन पद्धती :

'तेलंगणा सीमाभागातील निवडक लेखकांच्या साहित्यकृतींचा चिकित्सक अभ्यास' या संशोधनासाठी वर्णनात्मक संशोधन पद्धती, आशय विश्लेषण संशोधन पद्धती, ऐतिहासिक संशोधन पद्धती, क्षेत्रीय संशोधन पद्धती, मुलाखत अशा विविध पद्धतींचा अवलंब करण्यात येईल. या संशोधन कार्याच्या ओघात बदल होण्याची शक्यता नाकारता येणार नाही.

प्रकरण योजना:

प्रकरण पहिले : महाराष्ट्र व तेलंगणा सीमाभागाचा ऐतिहासिक आणि सांस्कृतिक संदर्भ

तेलंगणा सीमाभागातील मराठी साहित्याला फार जुनी परंपरा आहे. ऐतिहासिकदृष्ट्या या भागाला विशेष महत्त्व आहे. भाषावार प्रांतरचनेनुसार आंध्रप्रदेश हे पहिले राज्य आणि नंतर त्याची विभागणी होऊन तेलंगणाची निर्मिती झाली. या भागातील साहित्यिकांनी भाषेचा ऐतिहासिक ठेवा साहित्यातून जोपासला आहे. तेलंगणा सीमाभागातील मराठी साहित्यातून मराठी संस्कृतीची जोपासना होत असलेली दिसून येते त्याआधारे त्याचे स्पष्टीकरण या प्रकरणात करण्यात येईल.

प्रकरण दुसरे : सीमाभागातील साहित्याचे स्वरूप व परंपरा

देगलूर परिसरात दर्जेदार साहित्याची निर्मिती झाली. तेलंगणा सीमाभाग साहित्यातून प्रकट झाला आहे. महाराष्ट्र व तेलंगणातील संस्कृती, सण-उत्सव, धार्मिक विधी यांचा एकमेकांवर प्रभाव पडलेला दिसून येतो. श्रीराम पोट्टलू हे भाषावार प्रांतरचनेनुसार निर्माण होणाऱ्या आंध्रप्रदेशासाठी शहीद होणारे व्यक्मित्त्व. त्यांचाच आदर्श संयुक्त महाराष्ट्र निर्मितीवेळी होता. श्रीचक्रधर स्वामींचे तेलंगणातही वास्तव्य होते. नंतर ते महाराष्ट्रात आले त्यांच्या लीळातून साहित्याच्या स्वरूपाचा अभ्यास करता येणार आहे.

प्रकरण तिसरे : बाबू बिरादार यांचे साहित्य : स्वरूप आणि विशेष

बाबू बिरादार हे महाराष्ट्र-तेलंगणा राज्याच्या सीमेवरच्या नांदेड जिल्हयातील देगलूर तालुक्यातील 'काठेवाडी' सारख्या अत्यंत दुर्गम आणि छोट्याशा वाडीत राहणारे लेखक. बाबू बिरादार हे आपल्या साहित्यातून आदिम संस्कृती, लोकपरंपरा, इथल्या माती-माणसाशी असलेली घट्ट नाळ, हजारो सालाच्या लोकजगण्याच्या संचिताचं तत्त्वज्ञान आणि जगण्यातील गुंतागुंतीचा आविष्कार झालेला आहे. इथल्या देशीपणाचं मूळ त्यांच्या लेखनातून उतरते. लोकम्हणी, लोककथा, लोकगीते, दृष्टान्त, लोकोक्ती यामधून अखंड भारतातील अफाट ग्रामीणाचे विस्तारलेले जग बाबू बिरादारांना खुणावत असते. 'मातीखालचे पाय' या कादंबरीत सुंभाच्या कुटुंबाच्या वाताहतीची कहाणी आली. तर 'कावड' यात संसार व परमार्थ यात हेलकावणारे गोरख मास्तर पहायला मिळतत. 'अग्निकाष्ठ' या कादंबरीतून भाषेचे सामर्थ्य लक्षात येते. बिरादारांच्या कादंबऱ्यांतून स्वाभाविक बोलली जाणारी पात्रगत भाषा येते.

प्रकरण चौथे : पद्मा मदकुंटे यांचे साहित्य आणि तेलंगणाचा प्रभाव

प्रस्तुत प्रकरणाच्या माध्यमातून पद्मा मेदकुंटे यांच्या 'झापड', 'भयलाट', 'जायदाद' या कादंबऱ्यात आलेल्या भाषाशैलीवर तेलंगणाचा प्रभाव दिसून येतो.

मराठवाड्याच्या बोलीभाषेचा नितांत सुंदर लहेजा लेवलेली कादंबरी आहे. 'भयलाट' या कादंबरीत बहुभाषिक, बहुसांस्कृतिक व भू-सांस्कृतिक समन्वय साधला गेला आहे. शेती, शेतीवर अवलंबून असणारे अर्थकारण तसेच भाषा या कादंबरीत अत्यंत प्रत्ययकारी रीतीने प्रक्षेपित केली आहे. 'जायदाद' या कादंबरीमध्ये ग्रामजीवनातील नातेसंबंध यावर प्रकाश टाकला आहे. तसेच ग्रामजीवनातील नैतिकता लोप पावत असल्याचे भयावह वास्तव यात चित्रित केले आहे. परिसरातील बोलीभाषा, मराठी, तेलगू, कानडी इ. भाषेचा एक मिठास गोडवा या कादंबरीला प्राप्त झाला आहे. या भाषेच्या पडलेल्या प्रभावाचा शोध या प्रकरणातून घेण्यात येणार आहे.

प्रकरण पाचवे: तसनीम पटेल व लक्ष्मण मलगीरवार यांच्या साहित्यातून प्रकटणारे तेलंगणा सीमाभागातील प्रतिबिंब

तसनीम पटेल यांच्या 'भाळ-आभाळ' या आत्मकथनात बिलोली भागातील श्रीमंत-गरीब, श्रद्धा-अंधश्रद्धा, नात्यगोत्यांचे राजकारण, हिंदू-मुस्लीम मनाचा धांडोळा घेतला आहे. तसनीम म्हणजे खळखळता प्रवाह, सतत वाहणारा जीवनप्रवाह. राजकारण्यांच्या दाढ्या कुरवाळून मोठी पदं मिळवता आली असती मात्र सत्तेत बसणे हा त्यांचा स्थायीभाव नाही. तर जनसामान्यासाठी लढणे हाच त्यांचा स्थायीभाव आहे. तसनीम पटेल यांनी शैक्षणिक, सामाजिक व सांस्कृतिक क्षेत्रात योगदान दिले आहे. त्याचे प्रतिबिंब आत्मकथनातून उमटले.

लक्ष्मण मलगीरवार यांच्या 'ओले रान', 'उजळावया आलो वाटा' या काव्यसंग्रहातून बोली, निसर्गजाणिवा अभ्यासता येतात.

प्रकरण सहावे : सीमाभागातील साहित्यिकांच्या साहित्याचे वाङ्मयीन मूल्यमापन

महाराष्ट्र-तेलंगणा सीमाभागातील साहित्य दर्जेदार असूनही दुर्लक्षितच राहिले आहे. पद्मा मदकुंटे, तसनीम पटेल, लक्ष्मण मलगीरवार यांचे साहित्य वाङ्मयीनदृष्ट्या

मराठी भाषेला समृद्धता आणणारे आहे. या साहित्यात परंपरा, निसर्ग, बोलीभाषा, सण-उत्सव, नात्यागोत्यातील संघर्ष यांचे मूल्यमापन करण्यात येणार आहे.

प्रकरण सातवे : निष्कर्ष व समारोप

'तेलंगणा सीमाभागातील निवडक मराठी लेखकांच्या साहित्यकृतींचा चिकित्सक अभ्यास' या शोधप्रबंधात वरील प्रकरणांच्या माध्यमातून निश्चित झालेले निष्कर्ष मांडण्यात येणार आहेत. शेवटी परिशिष्टे जोडण्यात येणार असून त्याअंतर्गत काही प्रातिनिधिक लेखकांच्या मुलाखती, आवश्यक छायाचित्रे जोडण्यात येणार आहेत.

संदर्भ ग्रंथ सूची

१. बिरादार बाबू- कावड, अंत:पुरुष, अग्निकोष्ठ, गोसावी, मातीखालचे पाय, संभूती

२. मदकुंटे पद्मा - झापड, जायदाद, भयलाट

३. पटेल तसनीम- भाळ-आभाळ

४. मलगीरवार लक्ष्मण - आभाळ पाहताना

५. शेलार डॉ. सुधाकर - साहित्यसंशोधन : वाटा आणि वळणे

६. घोंगडे डॉ.रमेश, घोंगडे डॉ.अश्विनी - मराठी भाषा आणि शैली

७. सरवदे औदुंबर - बोलीविज्ञान

संशोधक

रमेश गोविंदराव शेंडगे

मार्गदर्शक

प्रा.डॉ.मारोती दशरथ कसाब

सहयोगी प्राध्यापक, मराठी विभाग

महात्मा फुले महाविद्यालय, अहमदपूर

ता.अहमदपूर जि.लातूर